जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 8 AUG 2021
पुढारी

# ५ हजार विद्यार्थ्यांनी दिली विद्यापीठ परीक्षेची मॉक टेस्ट

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०२०-२१ या शैक्षणिक वर्षातील मार्च-एप्रिल २०२१ च्या पदवी, पदव्युतर अभ्यासक्रमांच्या परीक्षांच्या अनुषंगाने शनिवारी पहिल्या दिवशी पाच हजार विद्यार्थ्यांनी ऑनलाईन पद्धतीने मॉक टेस्ट दिली.

विद्यापीठ अंतर्गत पदवी व पदव्युत्तरच्या ४३८ परीक्षांपैकी काही अभ्यासक्रमांच्या १० ऑगस्ट तर उर्वरित परीक्षा १८ ऑगस्टपासून ऑनलाईन पद्धतीने बी. ए., बी. कॉम., बी.एस्सी., एम.ए., एम. कॉम., एम.एस्सी., बीबीए., बीसीए., बीसीएस., बी. व्होक यासह व्यावसायिक अभ्यासक्रमांचा समावेश आहे. परीक्षेसंदर्भातील सर्व माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर आणि विद्यार्थ्यांना त्यांच्या मोबाईलवर पाठविली आहे, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक जी.आर. पळसे यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 8 AUG 2021
पुढारी

# एम.फिल.,प्री.पीएच.डी कोर्स वर्कच्या ऑनलाईन परीक्षा १० ऑगस्टपासून

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या वतीने कोव्हिड-१९ च्या पार्श्वभूमीवर आणि विद्यापीठ अधिकार मंडळाच्या निर्णयानुसार एम.फिल., प्री.पीएच.डी कोर्सवर्क परीक्षा दि.१० ऑगस्टपासून महाविद्यालय, अधिविभागस्तरावर ऑनलाईन पद्धतीने घेण्यात येणार आहेत. एम.फिल., प्री.पीएच. डी. कोर्सवर्क परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने होणार आहे. परीक्षेचे संचलन, पर्यवेक्षणाची जबाबदारी संबंधित महाविद्यालयांचे प्राचार्य, अधिविभागप्रमुख यांच्यावर असणार आहे. परीक्षेवेळी कोरोनाच्या अनुषंगाने यूजीसी, शासन व स्थानिक प्रशासनाने दिलेल्या नियमांचे पालन करावे, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक जी. आर. पळसे यांनी केले आहे.